**FAROOQ HIGH SCHOOL FOR GIRLS**

**Std: IX** **I[ST] SEMESTER EXAM 2019** **Time: 2hrs.**

**Date: 14 / 10 /2019** **Sub : Marathi** **Marks: 40**

## विभाग १ – गदय विभाग

प्र.१ (अ) पुढील गदय उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.

त्याचा मुलगा माझ्याएवढाच होता. सोलापूरला कुठल्याशा गिरणीत होता तो. दादूच्या खेडयातला जमिनीचा एक तुकडा सावकाराकडे खूप दिवस गहाण पडला होता. म्हातारपणामुळे शेती होईनाशी झाली, तेव्हा बायकोला घेऊन तो इथे आला आणि त्याने मुलाला सोलापूरला पाठवले. फार उशिरा झालेला एकुलता एक मुलगा होता तो त्याचा. "तुम्ही आई-बाप सोलापूरला मुलाकडेच का राहत नाही?" म्हणून मी त्याला विचारले . तेव्हा त्याने सांगितले, "आम्ही दोघं सोलापूरला गेलो, की तिथं पोराचा खर्च वाढणार, मग तो सावकाराकडली जमीन सोडवून कशी घेणार? बायको इथं कडधा न्ये विकून चार पैसे मिळवते. सोलापुरात ती काय करणार? तिथं मोड खपतात की नाही कोण जाणे नि सोलापुरात इथल्यासारखी कॉलेजं नाहीत, तेव्हा माझ्यासारख्या म्हाता याला तिथं कोण काम देणार ?"

"पण मुलावाचून कसं करमतं रे तुला ?"

"न करमायला काय झालं साहेब ? तुम्ही नाही का आलाय आईवडिलांना सोडून. तसाच माझा मुलगा मला सोडून गिरणीत गेलाय. मी इथं तुमचं काम करतोय ना, सोलापुरात अशीच कुणीतरी म्हातारी त्याला जेवायला घालत असेल."

तीन महिन्यांत दादूची नि माझी कमीत कमी तीन वर्षांची ओळख आहे असे वाटू लागले.

१.अ] चौकट पूर्ण करा. **(2)**

1) दादूच्या मुलाचे नोकरीचे ठिकाण ⟶ ☐

2) दादूची बायको विकते ⟶ ☐

आ] विधाने पूर्ण करा. **(2)**

1) " तुम्ही आई-बाप सोलापूरला ____________________

2) तीन महिन्यात दादूची नि ____________________

इ) ' लोकवस्तीत मैदाने आवश्यक आहेत ', यांवर तुमचे मत मांडा. **(2)**

Scanned by CamScanner

प्र.१ (ब) पुढील गदय उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.

आत शिरलात, कि काही गुंफांत तुम्हांला प्रशस्त लांबरुंद दालनं दिसतील. चार-पाच मीटर त्याची उंची. वर सपाट छत. दोन्ही बाजूंना भव्य स्तंभ कोरलेले अन` नक्षीदार प्रवेशदवारावर अर्धवर्तुळाकृती गवाक्षे. गवाक्षे म्हणजे हवा व उजेड आत येण्यासाठी खिडक्या. चला, माझ्यामागून ओळीने या.

आत शिरताच गारेगार वाटलं ना? उन्हातान्हातून प्रवास केल्याचा शिणवटा निघून गेला की नाही? लेण्यांतली हवा अशीच नेहमी गारेगार असते.

आता समोर लक्ष दया. केवढा प्रशस्त चौथरा आहे हा! आणि त्यावर कोण बसलं आहे सांगा बरं !'भगवान गौतम बुदध'. बुदध ओळखण्याची खूण म्हणजे पदमासन घालून बसलेले, डोळे अर्धवट मिटलेल्या कमळासारखे आणि नजर नाकाच्या शेंडयावर खिळलेली. मुखावर करुणेचा भाव. कानाच्या पाळ्या लोबंलेल्या. जवळजवळ खांदयाला भिडलेल्या. मस्तकावर कुरळ्या केसांच्या जटा. एवढं लक्षात ठेवलत, की तुम्हांला कोठेही गौतम बुदध ओळखता येतील.

इथल्या सगळ्या लेण्यांना नावं नाहीत; पण एकोणिसाव्या लेण्याला नाव आहे, त्याला म्हणतात गंधकुटी. हे लेणे तुम्ही सावकाशीनं पाहा. बराच वेळ लागेल, कारण ते आत, बाहेर व सगळीकडे कोरीव कामानं नटल आहे. त्याच्यासमोर दवारमंडप आहे. खांब सगळे वाटोळे. ते पहा दुसरे बुदध. खाली नव्हे, वर दोन खांबांच्या कमानीत! इथे ते उभे आहेत अन त्यांनी एक पायघोळ अंगरखा घातला आहे. त्याच्या चुण्या कशा अगदी स्पष्ट दिसतात. मुद्रासुदधा किती शांत, किती गंभीर!

१.अ] आकृती पूर्ण करा. (2)

बुदध ओळखण्याच्या खुणा → [ ] [ ] [ ] [ ]

आ] चौकट पूर्ण करा. (3)

1) लेण्यातील हवा असते. -------- [ ]

2) नक्षीदार प्रवेशद्वारावर असलेली ------- [ ]

3) एकोणीसाव्या लेण्याचे नाव -------- [ ]

इ) संज्ञा स्पष्ट करा. (1)

1) गवाक्ष == --------------

Scanned by CamScanner

## विभाग २ – पदय तिभाग

प्र.२ (अ) पुढील पद्य कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.

बिन भिंतीची उघडी शाळा
लाखो इथले गुरु
झाडे, वेली, पशू, पाखरे
यांशी गोष्ट करू

बघू बंगला या मुंग्यांचा
सूर ऐकूया त्या भुंग्यांचा
फुलाफुलांचे रंग दाखवित
फिरते फुलपाखरू

अ.1) आकृती पूर्ण करा. (2)

कवितेतून तुम्हांला कळलेले निसर्गातील गुरु

(2) दिलेल्या ओळींचा सरळ अर्थ लिहा. (2)

1) बिन भिंतीची उघडी शाळा लाखो इथले गुरु

2) फुलाफुलांचे रंग दाखवित फिरते फुलपाखरू

प्र.२ (ब) पुढील पद्य कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.

ब.1) आकृतीबंध पूर्ण करा. (2)

संत निर्मळा यांनी परमेश्वरासाठी वापरलेली विशेषणे

Scanned by CamScanner

अनाथांचा नाथ कृपावंत देवा |
घडो तुमची सेवा अहर्निशीं ||१||
अठ्ठाविस युगें विटेवरी उभा |
वामभागीं शोभा रुक्मादेवी ||2|
पतित पावन गाजे ब्रीदावळी |
पुरवावी आळी हीच माझी ||3||
उभा विटेवरी ठेवोनी चरण |
म्हणतसे बहिण चोखियाची ||४||

2) दिलेल्या ओळींचा सरळ अर्थ लिहा. (2)

1) अठ्ठाविस युगें विटेवरी उभा | वामभागीं शोभा रुक्मादेवी ||
2) पतित पावन गाजे ब्रीदावळी | पुरवावी आळी हीच माझी ||

## विभाग ३ – व्याकरण

प्र.३ (अ) काळ बदला. (1)

1) मी धावत गेलो. (वर्तमानकाळात लिहा.)

(ब) काळ ओळखा व लिहा . (1)

1) चार किंवा पाच रुपये मागेल.

(क) पुढील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (2)

1) चैन न पडणे. 2) थक्क होणे.

(ड) समानार्थी शब्द लिहा. (1)

1) श्रम ------- 2) पाखरे --------------

(इ) पुढील शब्दांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार करा. (1)

होता ,झाला, घोगरा, आवाज , त्याचा

Scanned by CamScanner

(ई) पुढील शब्द गटातील अचूक शब्द ओळखा व लिहा. (1)

1) क्त्पान , किड , गाडि ,रागीट -------

2) आंनद , आनंद ,आणदं , आणंद -------

(उ) पुढील वाक्यातील विरामचिन्हे ओळखा व लिहा. (कोणतेही दोन ) (1)

1) " आजी ,वारा कुठं राहतो ?"

प्र.४ (अ) पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. (4)

1) आमची सहल 2) सूर्य संपावर गेला तर --------------------

(ब) पत्रलेखन ----- (५)

शाळेजवळील रस्ता नादुरुस्त झाला आहे.

नादुरुस्त रस्ता त्वरित दुरुस्त करण्यासाठी नगराध्यक्षांना विनंती पत्र लिहा.

किंवा

नादुरुस्त रस्ता दुरुस्त केल्याबददल नगराध्यक्षांना आभाराचे पत्र लिहा.

क) पुढीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (4)

1) गोष्टलेखन--------- चतुर कावळा

2) पुढील उतारा वाचून चार प्रश्न तयार करा.

शिक्षक व सगळी मुले सकाळीच शाळेजवळ जमली. तेथून ती समुद्राच्या किनाऱ्याने खाडीकडे निघाली. किनाऱ्यावर नारळांची खूप झाडे होती. भरतीची वेळ होती. समुद्राच्या लाटा उसळत होत्या. किना याशी येऊन आदळत होत्या. मुलांना लाटांची मौज वाटत होती. त्यांचे पाय भिजत होते. पाण्याचे तुषार अंगावर उडत होते. पायाखाली वाळू गुदगुल्या करत होती.

मुलांना होडीत बसून सहल करायची होती. डुलत डुलत होडी निघाली. लाटा उठत होत्या. होडीवर आदळत होत्या. खाडीत थोडे फिरून होडी किनाऱ्याला लागली. मुले मजा करत घरी परतली.

Scanned by CamScanner